R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक १०९ शुक्रवार दि.०७ नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## पार्थ पवारांवर १८०० कोटींचा जमीन घोटाळ्याचा आरोप; अजित पवार अडचणीत?



पुणे : प्रतिनिधी उपमुख्यमंत्री अजित पवार हे शेतक-यांना नेहमीच फुकट लागतं असे म्हणतात. पण त्यांच्या मुलाला देताना १८०० कोटींची जमीन फक्त ३०० कोटी रुपयांत कशी दिली जाते. या ३०० कोटी रुपयांवरील स्टँप ड्युटी ४८ तासांत माफ होते. तुम्हाला का सर्व फुकट लागते, असा सवाल करत शिवसेना (ठाकरे) नेते तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अजित पवारांवर गंभीर आरोप केले आहेत. पुण्यातील एका जमिनीच्या व्यवहारामुळे राज्यात सध्या खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांच्या अमेडिया होल्डिंग एलएलपी कंपनीला तब्बल १८०४ कोटी रुपयांचा बाजारभाव असलेली जमीन फक्त ५०० रुपयांच्या बाँड पेपरवर अवघ्या ३०० कोटी रुपयांमध्ये विकत घेतल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

पुण्यातल्या कोरेगाव पार्क परिसरातील सरकारी मालकीच्या ४० एकर जमिनीच्या खरेदी व्यवहारामध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या जमिनीचा भाव कागदावर ३०० कोटी रुपये इतका आहे. ही सरकारी किंमत असून खरी किंमत त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असल्याचे दानवे म्हणाले. ही जमीन अमेडिया कंपनीने खरेदी केली आहे. अमेडिया कंपनीचे मालक उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मोठा मुलगा पार्थ पवार आणि त्यांचे मामेभाऊ दिग्विजय अमरसिंह पाटील आहेत. या प्रकरणामुळे अजित पवार आणि पार्थ अडचणीत आले आहेत.

अंबादास दानवे म्हणाले की, पुण्यात नेमकं काय सुरू आहे. राज्यात देवाभाऊचे सरकार आहे की ते मेवाभाऊ आहेत? असा सवाल त्यांनी केला. पार्थ पवार यांच्या कंपनीला जमीन देण्यासाठी दोन दिवसांत फाईल पुण्यातून मुंबईत येते आणि उद्योग विभागाकडून त्याला मंजुरी दिली जाते. १८०० कोटींची जमीन ३०० कोटींमध्ये फक्त स्टँप पेपरवर खरेदी केली जाते. एवढ्या वेगाने जर काम होत असेल तर हे सामान्य माणसासाठी का होत नाही?

जमिनी परत कराव्या लागतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, महाराष्ट्रात फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घ्यायचे आणि महार वतनाची जमीन घशात घालायची हा अजित पवारांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे का? असाही सवाल त्यांनी एक्स या सोशल मीडिया अकाऊंटवरील पोस्टमधून केला. माध्यमांसोबत बोलताना अंबादास दानवे म्हणाले की, पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणतात की जमीन अजून आमच्या ताब्यात आहे. जर अशा प्रकारे त्यांनी जमीन परत केली असेल तर राज्यातील सर्वच ठिकाणी अशा प्रकारे जमिनी परत कराव्या लागतील, असेही ते म्हणाले.

## दगाबाजी करणाऱ्या सरकार ला धडा शिकवा पक्षप्रमुख उध्दवजी ठाकरे



लातूर / प्रतिनिधी : - शेतकऱ्यांची फसवणूक करून वारंवार मतं घेतली पाहिजेत, मात्र शेतकऱ्यांना कुठल्याही पद्धतीने मदत द्यायची नाही असा उद्देश सरकारचा दिसून आहे. त्यामुळेच 'दगाबाज रे' आंदोलन सुरू आहे. सरकार कडून मदत जाहीर करून फसवणूक केली जात आहे, सरकारने मदत फक्त जाहीर केली तरी आधार मिळत नाही. पूर्वी शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन देऊन फसवण्यात आले आहे. त्यामुळे आम्ही 'दगाबाज रे' आंदोलनासह असंख्य शेतकऱ्यांनी हक्कासाठी रस्त्यावर उतरले. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी लढा उभारला असून सरकारकडून मदत मिळावी यासाठी ठिकठिकाणी दौरे करत आहेत. औसा तालुक्यातील भुसणी येथील शेतकऱ्यांनी ठाकरे साहेबांच्या संवाद दौर्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी ठाकरे साहेबांनी ठाकरे यांच्या समोर गैरसोयीचा व तक्रारींचा पाढा वाचला. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी विविध समस्यांबाबत मांडणी केली. शेतकऱ्यांनी वेळोवेळी शिक्षण फिस माफीचा प्रश्न मांडला. ठाकरे साहेबांनी सांगितले की, शेतकरी राजा जर सुखी समाधानी असेल तर आपण सर्व सुखी समाधानी आहोत.

सरकारने शेतकऱ्यांना शासन मदतीस पूर्णपणे उदासीनता दाखवली आहे. अशा सरकारला उलथून टाकले पाहिजे. यावेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार ओमराजे निंबाळकर , आमदार कैलास पाटील, आमदार मिलिंद नार्वेकर माजी आ. दिनकर माने, जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, बालाजी रेड्डी, नामदेव चाळक, जयश्री उटगे, दिनेश जावळे शिवसेनेचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## केलेल्या विकास कामांच्या आधारे रेणापूर नगरपंचायत निवडणूक आम्ही जिंकू :- अध्यक्ष धिरज देशमुख यांचे प्रतिपादन







लातूर:-- रेणापूर नगरपंचायत निवडणूकीची रणधुमाळी सुरू झाली असून या निवडणुकीत नगरपंचायतीवर काँग्रेसचा झेंडा फडकवण्याच्या दृष्टीने काँग्रेस भवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील बैठकीस लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष,प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते माजी आमदार धिरज विलासराव देशमुख,प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस तथा लातूर शहर व ग्रामीण निरीक्षक श्री जितेंद्र देहाडे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय साळुंखे,रेणापूर नगरपंचायत निवडणूक निरीक्षक सचिन पाटील यांच्या सह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. सदरील बैठकीत यापुर्वी जाहीर करण्यात आलेले रेणापूर नगरपंचायत निवडणूक प्रभाग निहाय पक्ष निरीक्षकांना नियुक्ती पत्राचे वाटप व त्यासोबतच लातूर ग्रामीण विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष म्हणून श्री विश्वजीत पाटील,किसान सेल लातूर तालुका अध्यक्षपदी श्री रामानंद जाधव,किसान सेल रेणापूर तालुका अध्यक्षपदी श्री दिपक जगदाळे, भादा सर्कल विभाग प्रमुख म्हणून ॲड असगर पटेल यांना निवडीचे पत्र प्रदान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. रेणापूर नगरपंचायतीच्या माध्यमातून विविध विकासकामांना प्राधांन्य देत नागरिकांना न्याय देण्याच्या भुमीकेतून आम्ही सारे एकसंघपणे या निवडणुकीस सामोरे जात आहोत.एकीकडे भाजपवाल्याची निष्क्रियता व जनतेप्रती असलेली उदासिनता तर दुसरीकडे आम्ही केलेल्या विकास कामाच्या आधारे ही निवडणूक आम्ही जिंकू असा विश्वास यावेळी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. यावेळी प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस जितेंद्र देहाडे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे यांनी आपल्या मनोगतातून रेणापूर नगरपंचायत निवडणूक संदर्भात नियोजन सांगून निवडणूकीतील मुद्यावर मार्गदर्शन केले.

## लातूर जिल्ह्यातील नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणूक: काँग्रेसची जोरदार तयारी सुरू!

### उमेदवारी अर्जांची प्रक्रिया सुरू; ९ नोव्हेंबर अंतिम मुदत

लातूर: लातूर जिल्ह्यातील उदगीर,अहमदपूर, निलंगा आणि अवसा नगरपरिषद तसेच रेनापुर नगरपंचायत निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून.आगामी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने युध्दपातळीवर तयारी सुरु केली आहे. जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी आज (गुरुवार) पक्षाचे अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करत इच्छुक उमेदवारांच्या अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया आणि उमेदवारी अंतिम करण्याच्या तारखांचा संपूर्ण रोडमॅप जाहीर केला. निवडणुका जिंकण्यासाठी पक्षाने संपूर्ण वेळापत्रक अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आखले असून, संपूर्ण प्रक्रिया लातूरमधील काँग्रेस भवन येथूनच पार पडणार आहे. अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया आणि अंतिम मुदत जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज भरून सादर करण्याची अंतिम तारीख ९ नोव्हेंबर २०२५, सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत असेल. हे अर्ज काँग्रेस भवन, लातूर येथे स्वीकारले जाणार असून काँग्रेसचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी आणि काँग्रेसच्या अध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष ह.भ.प. शरद देशमुख महाराज यांच्याकडे अर्ज स्वीकारण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ९ नोव्हेंबरला अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच १० नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा निवड समितीची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये दाखल झालेल्या सर्व अर्जांची छाननी करून,उमेदवारांच्या नावांची शिफारस तातडीने प्रदेश काँग्रेस कमिटीकडे पाठवण्यात येणार आहे. जिल्हा समितीने शिफारस केलेल्या नावांवर १२ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रदेश निवड समिती निर्णय घेणार आहे.प्रदेश निवड समिती या नावांवर अंतिम शिक्कामोर्तब करून उमेदवारांची यादी जाहीर करण्याची शक्यता आहे. जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी सर्व इच्छुकांनी वेळेचे बंधन पाळून आणि पक्षाच्या शिस्तीनुसार अर्ज दाखल करावेत, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. अभय साळुंके यांच्या या स्पष्ट वेळापत्रकामुळे लातूर काँग्रेसने निवडणुकीसाठी कंबर कसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या इच्छुक उमेदवारांची मुलाखत

**भावी नगराध्यक्ष व नगरसेवकांनी मुलाखातीस उपस्थित राहण्याचे आवाहन**

उदगीर /प्रतिनिधी :- माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद उदगीर सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या वतीने उदगीर शहरातील सर्व प्रभागातील इच्छुक उमेदवारांची मुलाखत शनिवार दि.८ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत आमदार संजयजी बनसोडे संपर्क कार्यालय, नगर परिषदेच्या पाठीमागे, उदगीर जि.लातूर येथे आयोजित करण्यात आली आहे. या मुलाखतीस शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून नगराध्यक्षपदासाठी व नगरसेवक पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी मागणी अर्ज दि.६ व ७ नोव्हेंबर २०२५ रोजी संपर्क कार्यालातुन प्रत्यक्ष घेवुन जावुन दि.८ नोव्हेंबर रोजी ईच्छुक उमेदवारांची मुलाखत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस तथा पक्षाचे निरीक्षक ॲड.व्यंकट बेद्रे , प्रदेश सरचिटणीस सुरेखा पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश नाडे हे मुलाखत घेणार आहेत. तरी सर्व इच्छुक उमेदवारांनी या मुलाखतीस उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ यांनी केले आहे.



## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर :- कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ६ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २० नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## सोयाबीनच्या दराची ५ हजारांकडे वाटचाल

लातूर : प्रतिनिधी

लातूरच्या आडत बाजारात दिवाळीपासून सोयाबीनची आवक दोन पटीने घटली आहे. असे असले तरी सोयाबीनच्या दरात मात्र वाढ होताना दिसून येत आहे. गेल्या तीन दिवसात सोयाबीनच्या दरात ५० रूपयांची वाढ झाली असून आडत बाजारात गुरूवारी सोयाबीनला ४ हजार ७५१ रूपये सर्वाधिक दर मिळाला आहे. सोयाबीनच्या दराची ५ हजार रूपयांकडे वाटचाल सुरू असून शेतक-यांचेही त्याकडे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

## अनास्थेचा कळस!

भारतात सहा कोटींहून जास्त भटकी कुत्री आहेत. दरवर्षी सुमारे दोन कोटी लोकांना वेगवेगळे प्राणी चावतात. त्यामध्ये ९२ टक्के घटना कुत्र्यांनी चावा घेण्याच्या आहेत. दरवर्षी रेबीजमुळे लोक मरतात. त्यातील ५० ते ६० टक्के मृत्यू हे १५ वर्षांखालील मुलांचे असतात. दोन वर्षांपूर्वी हैदराबादमध्ये कुत्र्यांच्या हल्ल्यात चार वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला होता. कुत्र्यांच्या झुंडीने या मुलाचे अक्षरशः लचके तोडले होते. महाराष्ट्रातही अशा घटना घडल्या आहेत. २००१ मध्ये झालेल्या एका कायद्यानुसार, देशात कुत्र्यांना ठार मारण्यास बंदी घालण्यात आली. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणण्यासाठी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश दिले होते. परंतु त्यांचे पालन झाले नाही. त्यामुळे न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. ३ नोव्हेंबरच्या सुनावणीला राज्यांच्या मुख्य सचिवांनी हजर राहण्याचे आदेश कोर्टाने दिले होते.

आतापर्यंत दिल्ली महानगरपालिका आणि पश्चिम बंगाल व तेलंगण या राज्यांनीच अंमलबजावणीबाबतची शपथपत्रे दाखल केली आहेत. याचा अर्थ अन्य राज्यांनी न्यायालयाच्या आदेशांबाबत बेपर्वाई दाखवली. ती पूर्णतः असमर्थनीय होती. खरंतर हा अनास्थेचा कळसच होता. त्यामुळेच निर्देशांचे पालन का केले नाही, याचे लेखी स्पष्टीकरण घेऊन येण्यास न्यायालयाने फर्मावले होते. त्यामुळे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांनी कोर्टात हजर होत अनुपालन प्रतिज्ञापत्र दाखल न केल्याबद्दल बिनशर्त माफी मागितली. न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या विशेष खंडपीठाने ती नोंदवून घेतली. आता या प्रकरणावर ७ नोव्हेंबर रोजी निर्देश पारित केले जाणार आहेत.

कुत्र्यांबाबतच्या क्रूरतेचा मुद्दा उपस्थित होताच माणसांबाबतच्या क्रूरतेचे काय, असा प्रतिसवाल न्या. विक्रम नाथ यांनी उपस्थित केला. मनेका गांधींसारख्या माजी पर्यावरणमंत्री आणि अनेक प्राणिप्रेमी संघटना जनावरांच्या हक्कांबद्दल जेवढे जागरूक असतात, तेवढे सर्वसामान्य माणसाच्या हक्कांबाबत जागरूक नसतात. भटके कुत्रे जेव्हा लहान मुले वा वृद्ध व्यक्तींवर जीवघेणे हल्ले करतात, तेव्हाच्या आक्रोशाची दखल कोण घेणार? १० ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या विरोधात सक्त भूमिका घेतली होती. मोकाट कुत्र्यांना निवारागृहांमध्ये ठेवण्याचे आदेश दिले होते. दिल्ली सरकार, महानगरपालिका तसेच एनसीआरमधील प्रशासकीय यंत्रणांनी शहरातील रस्ते आणि गल्लीबोळांना भटक्या कुत्र्यांच्या त्रासापासून मुक्त करण्याचे आदेश दिले.

या सर्व ठिकाणांवरून भटक्या कुत्र्यांना हटवावे आणि त्यांना निवारागृहांमध्ये ठेवावे. तसेच या संस्थांनी पुढच्या सहा आठवड्यांमध्ये ५००० मोकाट कुत्र्यांना पकडून या कामास सुरुवात करावी, असे कठोर आदेश न्यायालयाने तेव्हा दिले होते. दिल्ली एनसीआरमधील सर्व प्राधिकरणांनी अशा कुत्र्यांसाठी त्वरित निवारागृहे बनवावीत. तसेच त्यांच्यासाठी केलेल्या सुविधांबाबत न्यायालयाला माहिती द्यावी. कुत्र्यांच्या नसबंदीसाठी पुरेशा कर्मचार्यांची व्यवस्था करावी. त्यांच्यावर सीसीटीव्हीच्या माध्यमातून लक्ष ठेवावे, असे आदेशही दिले. वास्तविक राज्याराज्यांतील महापालिका आणि सरकारांनी स्वतःहून जनतेच्या याबाबतच्या तक्रारींची दखल घेणे आवश्यक होते. तसे न झाल्यास शेवटी न्यायालयालाच लक्ष घालावे लागते! मात्र आता मोकाट कुत्र्यांबाबत आपल्यासमोरील आदेशात यापूर्वी किंचित सुधारणा करताना सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण केवळ एनसीआर क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता देशव्यापी करण्यासाठीचे पाऊल उचलले आहे. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना नोटीस पाठवून या प्रकरणात पक्षकार बनवण्याचे निर्देश देण्यात आले होते.

दिल्लीतील एका लहान मुलीला भटका कुत्रा चावल्यानंतर रेबीज झाल्याचे वृत्त वाचून सर्वोच्च न्यायालयाने २८ जुलैला स्वेच्छा दखल घेत याप्रकरणी खटला दाखल करून घेतला. अगोदरच्या आदेशात भटक्या कुत्र्यांना निवारा केंद्रांमध्ये बंद करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या या आदेशाबाबत प्राणिप्रेमींच्या नाराजीची दखल घेत, न्यायालयाने याप्रकरणी नव्या खंडपीठाची स्थापना करत, आधीच्या आदेशांमध्ये सुधारणा केली होती. निर्बीजीकरण, लसीकरण व जंतुनाशक औषधे दिल्यानंतर निवारा केंद्रातील भटक्या कुत्र्यांना सोडून द्यावे, असे आदेश दिले होते. जे कुत्रे रेबीज संक्रमित आहेत, त्यांना मोकळे सोडू नये, असेही सर्वोच्च न्यायालयाने बजावले होते.

महापालिका व राज्यांना कुत्र्यांच्या नोंदी, पशुवैद्यक, कुत्रे पकडणारे कर्मचारी, विशेष वाहने व पिंजरे यासंबंधी पूर्ण आकडेवारीसह प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले होते. कुत्र्यांबाबत शासनाची कितपत तयारी आहे, याचा अंदाज त्यावरून येऊ शकेल. तसेच प्राण्यांच्या जन्म नियंत्रण नियमांची अंमलबजावणी संपूर्ण देशात समान पद्धतीने लागू करण्यात यावी, या न्यायालयाच्या सूचनेचेही पालन होणे आवश्यक आहे. यापूर्वी न्यायालयात दिलेल्या आदेशांची माहिती तुम्हाला कशी ठाऊक नाही? त्याबद्दलच्या बातम्याही सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या होत्या. तुमचे अधिकारी वृत्तपत्रे वाचत नाहीत का? समाजमाध्यमे पाहात नाहीत का? असे खडसावण्याची वेळ न्यायालयावर यावी, हे दुर्दैवी म्हणावे लागेल. १९६० मध्ये प्रिव्हेन्शन ऑफ क्रूॲलिटी टू ॲनिमल्स (पीसीए) हा कायदा संमत करण्यात आला. मात्र पीसीए किंवा राज्य महानगरपालिका कायद्यांतर्गत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी भटक्या कुत्र्यांना सार्वजनिक ठिकाणांहून हटवता येते. भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी २००१ मध्ये ॲनिमल बर्थ कंट्रोल रूल्स आणण्यात आले. कुत्र्यांची जबाबदारी प्राणी कल्याणासाठी काम करणार्या संस्था आणि स्थानिक सरकारी अधिकार्यांकडे देण्यात आली. मात्र २००१ चे नियम हे मानव आणि प्राण्यांचे हक्क समान पातळीवर ठेवतात आणि हे अजिबात योग्य नाही, अशी टीकाही मागे झाली आहे. भटक्या कुत्र्यांची समस्यादेखील सोडवू न शकणारा देश, अशी या देशाची प्रतिमा होत असून, देशाचे नाव खराब होत आहे, हे न्यायालयाचे मत विचार करायला लावणारे आहे. कबुतरांची समस्यादेखील आपण सोडवू शकलेलो नाही. प्रत्येक गोष्टीत न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागावा, यात प्रशासकीय यंत्रणेची अकार्यक्षमताच दिसून येते. हे चित्र बदलण्याची गरज आहे.

# ज्ञानक्रांतीचा पहिला दिवस : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी प्रवेश दिन



विद्यार्थी कसा असावा? याचं प्रतीक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. कितीही संकटे आली, कितीही अन्याय-अत्याचार झाले तरीही आपलं चारित्र्य न गमवता जिद्द आणि चिकाटीने त्यांना तोंड देणे हे एक सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्याचे लक्षण आणि त्या विद्यार्थी दशेला परिपूर्ण न्याय देतात ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. ७ नोव्हेंबर हा दिवस भारतीय समाज जीवनात, विशेषतः विद्यार्थ्यांच्या जगात एक ऐतिहासिक व प्रेरणादायी दिवस म्हणून ओळखला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी प्रवेश दिन हा केवळ एक दिवस नाही, तर ज्ञान, समानता आणि स्वाभिमानाच्या दिशेने उचललेले पहिले पाऊल आहे. ७ नोव्हेंबर १९०० रोजी बाबासाहेबांनी सातार्‍यातील प्रतापसिंग प्राथमिक शाळेत आपला शैक्षणिक प्रवास सुरू केला. शाळेकरिता वळणारी बारक्या भिवाची ती पावलं म्हणजे साधीसुधी नव्हती तर ती एक नव्या युगाची सुरवात होती. त्यावेळी त्यांचे नांव भिवा असे होते. या शाळेच्या रजिस्टरला १९१४ त्या क्रमांकासमोर आजही बाल भिवाची स्वाक्षरी असून हा ऐतिहासिक दस्तऐवज शाळा प्रशासनाने जपून ठेवला आहे. शाळेच्या वर्गाबाहेर बसून शिकणारा विद्यार्थी, पाण्याच्या एका घोटाला तरसलेला विद्यार्थी तर अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी हा प्रवास म्हणजे साधासुधा प्रवास नाही बरं कां ! हे टाकीचे घाव सोसल्यानंतर या विद्यार्थ्याने भारतीय संविधानाची मूळ रचना न्याय, सक्त आणि बंधुता या तत्त्वावर कां केली? याचं प्रकर्षाने जाणीव होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन म्हणजे एका अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगांतराची चाहूल म्हटली पाहिजे, कारण बाबासाहेबांचे पाऊल शाळेत पडल्यामुळेच ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे-वंचितांचे उद्धारकर्तेही झाले. एका अशा समाजातून आलेल्या या बालकाने, जिथे शिक्षण म्हणजे केवळ वरच्या जातींचा अधिकार मानला जायचा, तिथे प्रवेश घेऊन इतिहास घडवला. त्या छोट्या कृतीतून एका नव्या युगाचा उदय झाला, ज्ञानक्रांतीचा आरंभ! हा दिवस म्हणजे त्या संघर्षमय प्रवासाच्या पहिल्या पानाचा स्मरणदिन आणि परिवर्तनाची सुरुवात. डॉ. आंबेडकरांनी त्या शाळेच्या दारातून प्रवेश घेतला आणि पुढे शिक्षणाच्या शिखरावर जाऊन संपूर्ण भारताला अंध:कारातून प्रकाशाकडे नेले. डॉ. आंबेडकरांनी जगाला एक अमूल्य मंत्र दिला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. त्यांच्यासाठी शिक्षण हे फक्त पदवी मिळवण्याचं साधन नव्हतं; तर ते स्वातंत्र्याचं आणि आत्मसन्मानाचं शस्त्र होतं. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचं मूलभूत साधन बनवलं. कारण समाजातली विषमता तोडायची असेल, तर ती केवळ कायद्याने नाही तर शिक्षणानेच शक्य आहे.




आजच्या तरुण पिढीने हे स्मरण ठेवणं आवश्यक आहे की, बाबासाहेबांसाठी शिक्षण म्हणजे केवळ करिअर नव्हे, तर चरित्रनिर्मितीचा मार्ग होता. आजच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी प्रवेश दिन फक्त साजरा न करता, त्यामागचा आशय समजून घेणं गरजेचं आहे. शाळेच्या दारात पाऊल टाकणं म्हणजे केवळ शिक्षणात प्रवेश नाही, तर चेतनेच्या प्रवासाची सुरुवात आहे. तर प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःला विचारावे की, मी शिक्षण केवळ नोकरीसाठी घेतोय की समाजासाठी काही करणार आहे? मी ज्ञानाचा उपयोग माझ्या आणि इतरांच्या उन्नतीसाठी करतोय का? बाबासाहेबांच्या शिकण्याच्या भुकेला मी जिवंत ठेवतोय का? हे प्रश्नच विद्यार्थी प्रवेश दिन साजरा करण्यामागचं खरं तत्त्वज्ञान आहे.

आज डिजिटल युगात माहितीच्या सागरात आपण विहार करतोय, पण ज्ञानाचा दीप हरवतोय. डॉ. आंबेडकरांचे तत्त्व आजही तेवढेच लागू आहेत. शिकणं म्हणजे प्रश्न विचारणं आणि प्रश्न विचारणं म्हणजे विचारशक्ती जिवंत ठेवणं. आज समाजात पुन्हा अन्याय, असमानता आणि अंधश्रद्धेचं वातावरण वाढत आहे. अशावेळी बाबासाहेबांचं शिक्षणतत्त्व आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांना योग्य दिशादर्शन करतात. ७ नोव्हेंबरचा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की, प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात समाजबदलाची किल्ली आहे. बाबासाहेबांचा शैक्षणिक प्रवास म्हणजे प्रत्येक दीन, दलित, शोषित, उपेक्षित व्यक्तीसाठी प्रेरणेचा झरा आहे. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकं उघडू नयेत, तर मनंही उघडावी. कारण जेव्हा मन शिक्षित होतं, तेव्हाच समाज प्रकाशमान होतो.

बाबासाहेब शाळेत गेल्यामुळेच ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून जगभर गौरव होतो. त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकार ही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली, म्हणूनच बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासला कूस बदलवयास लावणारी क्रांतिकारी घटना ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते. त्यांनी आपला हा विद्या व्यासंग आयुष्याच्या शेवटपर्यंत जपला. आजचा प्रत्येक विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी तयार होणे काळाची गरज आहे. शिक्षण हेच एकमेव उन्नतीचे साधन आहे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या कठोर परिश्रमाची जाण सर्व विद्यार्थांना होण्यासाठी २७ ऑक्टोबर २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने खास शासन निर्णय जारी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिन म्हणजे ७ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी विद्यार्थी दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा असे निर्देशित केले आहे. तसेच या शासन निर्णयामध्ये विद्यार्थी दिवस या उपक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये त्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर विविध कार्यक्रम जसे निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्य वाचन इत्यादि उपक्रम आयोजित करण्याचे सूचनाही आहेत. त्यामुळे सर्वांनी खूप शिका, विचार करा आणि परिवर्तन घडवा. तुमच्या मेहनतीमुळे आणि समर्पणामुळे तुम्ही मोठे यश मिळवावे, हीच सदिच्छा. सर्वांना विद्यार्थी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

*********

प्रवीण बागडे
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# व्याज दर कपातीचा जागतिक परिणाम

अमेरिकी फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी २२ ऑगस्ट रोजी फेडरल रिझर्व्हच्या वार्षिक सभेत बोलताना व्याज दर कपातीच्या निर्णयाचे सूतोवाच केले. पत धोरणाची नियोजित बैठक १६ अणि १७ सप्टेंबर रोजी होणार असून यात व्याज दर कपातीचा निर्णय घेतला जाऊ शकतो. पॉवेल यांच्या मते, अमेरिकेत सध्या बेरोजगारीचे संकट आहे. शिवाय अलीकडच्या काळात कामगारांची मागणी आणि पुरवठा यात उल्लेखनीय घट नोंदली गेली आहे.

अभिजित कुलकर्णी, अर्थतज्ज्ञ प्रामुख्याने जुलै महिन्यात मागील वर्षाच्या महिन्याच्या तुलनेत रोजगाराची वाढ कमीच राहिली आहे. त्याचवेळी आगामी महिन्यातही कामगार कपातीची शक्यता आहे. अशावेळी व्याज दर कपातीचा निर्णय घेऊन दिलासा दिला जाऊ शकतो. पॉवेल यांच्या मते, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्क धोरणामुळे अमेरिकेत महागाईवाढीची शक्यता आहे. कारण, अनेक आवश्यक वस्तूंची निर्यात भारतासह अनेक देश अमेरिकेला करतात; पण शुल्कवाढीमुळे त्याची किंमत अनेक पटींनी वाढली आहे. पॉवेल यांनी शुल्कवाढीचा परिणाम हा स्पष्टपणे बाजारात दिसत असल्याचे म्हटले आहे; मात्र हा प्रभाव फार काळ टिकणार नाही, असाही आशावाद व्यक्त केला.



अर्थात, त्यांनी सध्याच्या शुल्कवाढ धोरणांमुळे महागाईचा भडका बराच काळ राहू शकतो, असेही सांगितले. परिणामी, रोजगार आणि महागाईसारख्या जोखमीला नियंत्रित करताना अडचणी येऊ शकतात. म्हणूनच धोरणात्मक व्याज दरात घट करण्याची गरज भासू शकते. वास्तविक गुंतवणूकदारांनी व्याज दर कपातीबाबत अगोदरपासूनच आशा व्यक्त केलेली होती; परंतु पॉवेल यांच्या ताज्या वक्तव्याने सप्टेंबरच्या फेडरल रिझर्व्हच्या बैठकीत धोरणात्मक व्याज दरात कपात होईल, हे आता स्पष्ट झाले आहे.

अध्यक्ष ट्रम्पदेखील फेडरल रिझर्व्हवर व्याज दरात कपात करण्यासाठी दबाव आणत आहेत, जेणेकरून अमेरिका विकासाच्या संथ गती किंवा मंदीच्या सावटाबाहेर येईल. फेडरल रिझर्व्हच्या मते, बेरोजगारीचा दर कमी आहे म्हणून आणि महागाईच्या शक्यतेपोटी धोरणात्मक व्याज दरात वाढ केली जाणार नाही; मात्र कामगार कपात केली जात असेल किंवा अन्य कारणांनी महागाई वाढत असेल, तर व्याज दर वाढविण्याचा विचार केला जाईल. पॉवेल यांनी दोन टक्के महागाई दराचे लक्ष्य निश्चित करण्यावर भर दिला आहे. अमेरिकेची फेडरल रिझर्व्ह जगभरातील केंद्रीय बँकांची शिखर बँक मानली जाते. यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे, अमेरिकी डॉलर हा जगातील सर्वात सक्षम चलनापैकी एक मानला जातो आणि सामरिक तसेच आर्थिक दृष्टिकोनातूनही अमेरिका जगातील सर्वात प्रबळ देश आहे. त्यामुळे फेडरल रिझर्व्हच्या पावलावर पाऊल टाकत जगभरातील केंद्रीय बँका कामकाज करतात; पण सर्व देशांची आर्थिक स्थिती वेगवेगळी असल्याने काही वेळा काही देशांच्या केंद्रीय बँका फेडरल रिझर्व्हपेक्षा वेगळा निर्णय घेतात. काही अपवाद सोडला, तर भारताने देखील फेडरल रिझर्व्हने घेतलेल्या निर्णयाला अनुसरूनच निर्णय घेतले आहेत. फेडरल रिझर्व्हची सध्याची भूमिका पाहता जगभरातील प्रमुख देशांच्या केंद्रीय बँका आगामी पतधोरण आढावा बैठकीत धोरणात्मक व्याज दर 'जैसे थे' ठेवू शकतील किंवा व्याज दरात कपात करू शकतात.

भारताच्या पत धोरण आढावा समितीने सहा ऑगस्टच्या पतधोरण बैठकीत रेपो रेट ५.५० टक्के कायम ठेवला, तर त्याचवेळी स्थायी ठेव सुविधा (स्टँडिंग डिपॉझिट फॅसिलिटी) दर ५.२५ टक्के आणि मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी ५.७५ टक्के दराच्या पातळीवर राहिला आहे. एनडीए आणि आरबीआय विकास दरात वेग आणू इच्छित आहेत आणि त्यासाठी रेपो रेट 'जैसे थे' किंवा कमी करणे गरजेचे आहे. आरबीआयने पतधोरण आढावा बैठक २०२५-२६ साठी ग्राहक मूल्य निर्देशांक (सीपीआय) चलनवाढीच्या ३.१ च्या स्तरावर राहण्याचा अंदाज बांधला. तो अंदाज मागील अंदाजाच्या तुलनेत कमीच आहे आणि प्रत्यक्षात जीडीपीचा विकास दर हा अंदाजाला ६.५ टक्के ठेवू शकतो आणि ही बाब आरबीआयच्या महागाई व्यवस्थापनाबात असणारी सजगता दाखविणारी आहे.

आरबीआयच्या मते, वैयक्तिक पातळीवरचा खर्च आणि सरकारी भांडवली खर्चामुळे देशांतर्गत विकासात मवाळपणा आला आहे. मात्र भूराजनीतिक तणाव अणि जागतिक स्तरावरील व्यापारी तणावामुळे विकासात अडथळे येत आहेत; मात्र आरबीआय यावरही नियंत्रण मिळवण्यात यश मिळवेल, अशी आशा आहे. अमेरिकेत धोरणात्मक व्याजदर कमी करण्याचा प्रस्ताव आणण्यामागे प्रमुख कारण म्हणजे, अमेरिकेतील संभाव्य आर्थिक मंदीची शक्यता, व्यापार स्पर्धा, फेडरल रिझर्व्हच्या दृष्टीने महागाई आणि रोजगार संकटाची वाढती शक्यता ही कारणे आहेत. अमेरिकेत अजूनही विकासाची गती कमीच आहे आणि त्यात वेग आणण्यासाठी धोरणात्मक व्याज दर कमी करणे आवश्यक आहे. व्याज दरात कपात केल्याने कर्जाला मागणी वाढेल आणि आर्थिक घडामोडींना चालना मिळेल.

अमेरिकेप्रमाणेच चीनमध्येदेखील उत्पादन, विक्री आदींचा विकास दर अपेक्षेपेक्षा कमीच आहे. त्याचवेळी जीडीपीचा विकास दर २०२४ मध्ये पाच टक्के होता आणि तो आता २०२५ मध्ये ३.९५ टक्के राहण्याची शक्यता आहे. चीनमध्ये जुलै महिन्यात महागाईचा दर शून्य टक्के राहिला आणि तो सप्टेंबर २०२२ मध्ये २.८ टक्के होता. २०२४ मध्ये चीनची सरासरी वार्षिक चलनवाढ २.८ टक्के राहिलेली आहे. विकास दरात वेग आणण्यासाठी चीनची राष्ट्रीय बँक 'पीपल्स बँक ऑफ चायना'ने कर्जाच्या व्याज दरात कपात केली आहे.

या माध्यमातून विकास दरात वेग आणायचा आहे. शिवाय चीन सुशासनाच्या समस्येचादेखील मुकाबला करत आहे. परिणामी, परकी गुंतवणूकदार चीनमध्ये येण्यास टाळाटाळ करत आहेत, तर काहीजण भारताकडे जात आहेत. सांख्यिकी कार्यालय युरोस्टेटच्या जुलैच्या आकडेवारीनुसार युरोपीय संघात २०२४ मध्ये जीडीपीचा विकास दर एक टक्के राहिला, तर तो २०२३ मध्ये ०.७ टक्के होता. त्याचवेळी २०२५ मध्ये युरो झोनमध्ये महागाई दर दोन टक्के होता. युरोपीय संघात हा दर २.३ टक्के राहिलेला दिसून येतो. ब्रिटनमध्ये चलनवाढीचा दर जुलै २०२५ मध्ये ३.८ टक्के राहिला आहे, तर जून २०२५ मध्ये ३.६ टक्के होता. त्याचवेळी विकास दर २०२५ च्या दुसर्या तिमाहीत ०.३ टक्के, तर २०२५ च्या पहिल्या तिमाहीत ०.७ टक्के राहिला आहे.आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने २०२५ साठी जागतिक आर्थिक विकासाचा अंदाज कमी करत तो २.८ टक्के केला आहे. त्याचवेळी २०२६ या काळात तो तीन टक्के राहण्याचा अंदाज सांगितला गेला आहे. २०२५ मध्ये अमेरिकेत १.८ टक्के दराने विकास होण्याची शक्यता असून तो अंदाज अपेक्षेपेक्षा खूपच कमी आहे. विकसनशील अर्थव्यवस्थेच्या विकास दरातदेखील घट होण्याची शक्यता आहे. २०२५ मध्ये विकसनशील देशांचा विकास दर ३.७ टक्के राहू शकतो आणि तो जागतिक सरासरीच्या २.८ टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

# नंतरचे धोके कोणते? 'या' चुका ठरतात किडनी निकामी होण्यास कारणीभूत

बॉलीवूड व टीव्हीवरील प्रसिद्ध अभिनेते 'साराभाई व्हर्सेस साराभाई'फेम अभिनेते सतीश शाह यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सतीश शाह मूत्रपिंडाशी संबंधित आजाराने ग्रस्त होते. अभिनेते सचिन पिळगावकर यांनी 'न्यूज १८'ला सांगितले की, शाह यांनी यापूर्वी मूत्रपिंड प्रत्यारोपण (किडनी ट्रान्सप्लांट) केले होते. त्यांच्या निधनामुळे पुन्हा एकदा मूत्रपिंड प्रत्यारोपणाचे यश आणि धोके यावर चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः जेव्हा शरीर प्रत्यारोपित अवयव नाकारते तेव्हा काय होते, असा प्रश्न उपस्थित होताना दिसत आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपण अयशस्वी होण्याची कारणे काय? शरीरावर त्याचे काय परिणाम होतात? किडनी निकामी झाल्यास शरीरात कोणती लक्षणे दिसून येतात? त्याविषयी जाणून घेऊयात मूत्रपिंड प्रत्यारोपण मूत्रपिंड हा आपल्या शरीरातील महत्त्वाच्या अवयवांपैकी एक आहे. जेव्हा शरीरातील दोन्ही मूत्रपिंडे त्यांचे काम योग्यरीत्या करू शकत नाहीत, तेव्हा त्या व्यक्तीला मूत्रपिंड प्रत्यारोपणाची गरज भासते. अलीकडच्या काळात मूत्रपिंड निकामी होण्याचे प्रमाण वाढले आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपणामध्ये रुग्णाच्या शरीरातील एक किंवा दोन्ही किडनी काढून टाकल्या जातात आणि त्याऐवजी दाताकडून किडनी दिली जाते. एखाद्या व्यक्तीची किडनी निकामी झाल्यास त्यांना डायलिसिस करावे लागते. परंतु, जेव्हा डायलिसिसचीदेखील मदत होत नाही, तेव्हा रुग्णांना प्रत्यारोपणाचा पर्याय निवडावा लागतो. भारतात मूत्रपिंड प्रत्यारोपणाचा खर्च सरासरी ५ लाख ते १५ लाख रुपये असतो. रुग्णालय, प्रत्यारोपणाचा प्रकार, रुग्णाची वैद्यकीय स्थिती आणि प्रत्यारोपणानंतरची काळजी यासारख्या अनेक घटकांवर हा खर्च अवलंबून असतो. वैद्यकीय उपचारांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे प्रत्यारोपणाच्या यशाचा दर लक्षणीयरीत्या सुधारला आहे. रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारी औषधे, योग्य दाता मिळणे आणि प्रत्यारोपणानंतरची काळजी यामुळे रुग्ण आणि प्रत्यारोपित मूत्रपिंड (ज्याला ग्राफ्ट सर्व्हायव्हल म्हणतात) या दोन्हींच्या जगण्याच्या दरात गेल्या काही दशकांत सतत सुधारणा झाली आहे, असे 'न्यूज १८'ने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे. प्रत्यारोपणानंतर एखादी व्यक्ती किती काळ जगू शकते, यावर अनेक घटक परिणाम करतात. मधुमेह किंवा हृदयविकार यांसारखे मोठे विकार नसलेले तरुण प्राप्तकर्ते अधिक चांगले जीवन जगतात. औषधे नियमित घेणे, नियमित तपासणी करणे आणि संसर्गावर नियंत्रण ठेवणेदेखील यात महत्त्वाचे ठरते. एकूणच, डायलिसिसवर असलेल्या रुग्णांपेक्षा प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांचे आयुष्यमान अधिक असते, असेही 'न्यूज १८'ने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपण अयशस्वी होण्याची कारणे काय?मूत्रपिंड प्रत्यारोपण अयशस्वी होण्याला ग्राफ्ट लॉस देखील म्हणतात. जेव्हा प्रत्यारोपित मूत्रपिंड योग्यरित्या कार्य करणे थांबवते, तेव्हा ही स्थिती उद्भवते. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होणे, संसर्ग, औषधांशी संबंधित समस्या किंवा अंतर्निहित आरोग्य स्थिती यासह अनेक घटक प्रत्यारोपित मूत्रपिंड निकामी होण्यास कारणीभूत ठरू शकतात. 'न्यूज १८'ने दिलेल्या वृत्तानुसार खालील घटक मूत्रपिंड निकामी होण्यास कारणीभूत ठरू शकतात १. प्रत्यारोपित मूत्रपिंड शरीर का नाकारते? कधीकधी प्राप्तकर्त्याची रोगप्रतिकारक शक्ती नवीन मूत्रपिंड स्वीकारत नाही आणि त्यावर हल्ला करते. हे सहसा प्रत्यारोपणानंतर पहिल्या काही महिन्यांत ते वर्षाच्या आत घडते. इंडियन जर्नल ऑफ नेफ्रोलॉजी मधील अभ्यासानुसार, यामुळे सुमारे १० ते १५ टक्के प्राप्तकर्ते प्रभावित होतात. परंतु, लवकर निदान झाल्यास, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारी औषधे दिल्यास यावर उपचार करता येतात. क्रॉनिक रिजेक्शन : ही स्थिती अनेक वर्षांमध्ये विकसित होते. शरीराने दीर्घकाळ नकार दिल्यामुळे मूत्रपिंडाच्या ऊतींचे नुकसान होते, ज्यामुळे कार्यक्षमतेत घट होते. दीर्घकाळ ग्राफ्ट अयशस्वी होण्याचे हे सर्वांत सामान्य कारण आहे. औषधांचे पालन न करणे : रोगप्रतिकारक शक्ती नियंत्रित ठेवणाऱ्या औषधांचे डोस चुकवल्यास नकाराचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. २. रक्तवहिन्यांसंबंधीची गुंतागुंत (व्हॅस्क्युलर कॉम्प्लिकेशन)रक्ताच्या गुठळ्या : प्रत्यारोपित मूत्रपिंडाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमधील गुठळ्या रक्तप्रवाह रोखू शकतात, ज्यामुळे मूत्रपिंड निकामी होऊ शकते. या परिस्थितीत मूत्रपिंड काढून टाकण्याची आवश्यकता भासू शकते. ३. संसर्ग (इन्फेक्शन) विषाणूजन्य संसर्ग : साइटोमेगॅलोव्हायरस (उचत), बीके विषाणू (BK virus) किंवा एबस्टीन–बार विषाणू (Epstein-Barr virus) यांसारखे विषाणू मूत्रपिंडाचे थेट नुकसान करू शकतात किंवा रोगप्रतिकारक प्रतिसादावर परिणाम करू शकतात. त्यामुळे ग्राफ्टला हानी पोहोचते. विशेषतः बीके विषाणू हा प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांमध्ये मूत्रपिंड खराब होण्याचे सामान्य कारण आहे. जीवाणूजन्य किंवा बुरशीजन्य संसर्ग : रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झाल्यामुळे हे होऊ शकते. त्यामुळे शरीराची संसर्गाशी लढण्याची क्षमता कमकुवत होते आणि मूत्रपिंडाचे नुकसान होऊ शकते. ४. मूळ मूत्रपिंड विकाराची पुनरावृत्ती काही मूत्रपिंड विकार ज्यामुळे मूळ मूत्रपिंड निकामी झाले होते, जसे की ग्लोमेरुलोनेफ्रायटिस, फोकल सेगमेंटल ग्लोमेरुलोस्केलेरोसिस (एफएसजीएस) किंवा ल्युपस नेफ्रायटिससारखी परिस्थिती पुन्हा उदभवू शकते. त्यामुळे ग्राफ्टचे नुकसान होते किंवा ते निकामी होते. एफएसजीएसमध्ये पुनरावृत्तीचा दर जास्त असतो. ५. औषधांचा शरीरावरील दुष्परिणाम रोगप्रतिकारक औषधांचे दुष्परिणाम : कॅल्सीन्यूरिन इनहिबिटर (उदा. टॅक्रोलिमस किंवा सायक्लोस्पोरिन)सारखी औषधे नकार टाळण्यासाठी आवश्यक आहेत; परंतु कालांतराने ती मूत्रपिंडासाठी विषारी ठरू शकतात. त्यामुळे कॅल्सीन्यूरिन इनहिबिटरमुळे नेफ्रोटॉक्सिसिटी म्हणून ओळखले जाणारे नुकसान होते. ६. शस्त्रक्रिया किंवा तांत्रिक गुंतागुंत मूत्रगळती किंवा अडथळे : मूत्रवाहिनी (मूत्रपिंडाला मूत्राशयाशी जोडणारी नळी)शी संबंधित समस्यांमुळे मूत्रगळती किंवा मूत्रप्रवाहात अडथळा येऊ शकतो. त्यावर वेळेत उपचार न केल्यास मूत्रपिंडाचे नुकसान होऊ शकते. ७. दात्याशी संबंधित घटक दात्याच्या मूत्रपिंडाची निकृष्ट गुणवत्ता : ज्येष्ठ दात्यांकडून किंवा पूर्वीपासून असलेल्या विकारांसह मिळालेल्या मूत्रपिंडांचे दीर्घायुष्य कमी असू शकते. दात्याच्या मूत्रपिंडातून आलेले संसर्ग किंवा कर्करोगही ग्राफ्टला धोका पोहोचवू शकतात. ८. प्राप्तकर्त्याचे आरोग्य शरीरातील इतर विकार: मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा हृदयविकार यांसारख्या स्थितींमुळे प्रत्यारोपित मूत्रपिंडावर ताण येऊ शकतो. त्यामुळे मूत्रपिंड निकामी होण्याचा धोका वाढतो. जीवनशैली घटक : खराब आहार, धूम्रपान किंवा पाठपुराव्याचा अभाव ग्राफ्टच्या (मूत्रपिंड प्राप्तकर्त्याच्या) जगण्यावर नकारात्मक परिणाम करू शकतो. मूत्रपिंड प्रत्यारोपणाचे धोके मूत्रपिंड प्रत्यारोपण सामान्यतः यशस्वी होत असले तरी त्याचे धोके समजून घेणेही तितकेच आवश्यक आहे. या शस्त्रक्रियेच्या धोक्यांमध्ये रक्तस्राव, संसर्ग, नवीन मूत्रपिंडाच्या रक्तवाहिन्यांमध्ये रक्ताच्या गुठळ्या, मूत्रगळती किंवा अडथळा यांचा समावेश होतो. हे धोके सहसा शस्त्रक्रियेदरम्यान किंवा त्यानंतर लगेच दिसून येतात. सर्वांत मोठा सततचा धोका म्हणजे नकार. १५ ते २० टक्के प्राप्तकर्त्यांचे शरीर नवीन अवयव नाकारते; मात्र चांगल्या औषधांमुळे याचाही दर आता कमी झाला आहे. इतर धोक्यांमध्ये मूत्रपिंड दात्याशी संबंधित समस्या समाविष्ट आहेत, जसे की संसर्ग किंवा कर्करोग संक्रमित होणे. ज्येष्ठ व्यक्ती, गंभीर हृदयविकार, सक्रिय कर्करोग किंवा औषधांचे पालन न केलेल्या रुग्णांना याचा जास्त धोका असतो. हे धोके टाळण्यासाठी प्राप्तकर्त्यांना वारंवार तपासणी, निरोगी जीवनशैली आणि आजारी लोकांशी संपर्क टाळणे आवश्यक आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपण अनेकांना दीर्घायुष्य प्रदान करते; परंतु त्यासाठी काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे.



## 'या' एका व्हिटॅमिनमुळे तुमची किडनी होऊ शकते निकामी
## तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय सेवन केले, तर फायद्याऐवजी होईल नुकसान



शरीर निरोगी ठेवण्यासाठी जीवनसत्त्वांपासून ते खनिजांपर्यंत सर्व गोष्टींची आवश्यकता असते. जीवनसत्त्व ई आणि बी १२ यासोबतच निरोगी शरीर राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे जीवनसत्त्व म्हणजे व्हिटॅमिन डी. व्हिटॅमिन डी आपल्या हाडे, दात आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठी महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्याची कमतरता भरून काढणे महत्त्वाचे आहे. असं असताना जास्त प्रमाणात व्हिटॅमिन डीचे सेवन केल्यास ते हानिकारकही ठरू शकते हेही लक्षात ठेवणं गरजेचं आहे. जास्त प्रमाणात व्हिटॅमिन डी चे सेवन केल्याने तुमच्या मूत्रपिंडांवरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो. सूर्यप्रकाशाची कमतरता भरून काढण्यासाठी किंवा चांगले आरोग्य राखण्यासाठी बरेच लोक व्हिटॅमिन डीच्या गोळ्या घेतात. असं असताना ते अनेकदा जास्त प्रमाणात डोस घेतात. त्यामुळे त्यांचे आरोग्य सुधारण्याऐवजी बिघडते. जर तुम्ही अविचारीपणे व्हिटॅमिन डीच्या गोळ्या घेत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे.

चेन्नईतील एशियन इन्स्टिट्यूट ऑफ नेफ्रोलॉजी अँड युरोलॉजी शाखेचे सल्लागार नेफ्रोलॉजिस्ट (किडनी स्पेशालिस्ट) आणि किडनी ट्रान्सप्लांट डॉ. नवीनथ एम. यांनी व्हिटॅमिन डीचे अति प्रमाणात सेवन केल्याचे दुष्परिणाम सांगितले आहेत. बहुतेक लोकांना दररोज फक्त थोड्या प्रमाणात व्हिटॅमिन डी ची आवश्यक असते. किडनी तज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे, लोकांना दररोज सुमारे ४०० ते १००० आययू व्हिटॅमिन डीची आवश्यकता असते. असं असताना दररोज ४००० आययू पेक्षा जास्त किंवा अनेक महिन्यांपर्यंत ८००–१२००० आययू घेणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.

तज्ज्ञ स्पष्ट करतात की, काही लोक नकळत दररोज ६०००० आययू टॅब्लेट घेतात, जे खूप जास्त प्रमाण आहे. यामुळे रक्तातील कॅल्शियम वाढते. याला हायपरकॅल्सेमिया म्हणतात. यामुळे मूत्रपिंडांवर जास्त दबाव येतो आणि त्यांचे नुकसानदेखील होऊ शकते. जास्त व्हिटॅमिन डी किडनीचे नुकसान कसे करते? तज्ज्ञ स्पष्ट करतात की, शरीरात जास्त प्रमाणात व्हिटॅमिन डी तुमच्या किडनीसाठी हानिकारक असू शकते. जेव्हा मूत्रपिंडांना बराच काळ रक्तातून जास्त कॅल्शियम काढून टाकावे लागते, तेव्हा हे कॅल्शियम किडनीमध्ये जमा होऊ लागते. यामुळे हळूहळू किडनीमध्ये खडे तयार होतात. कॅल्शियम किडनीतही जमा होते आणि किडनीतील फिल्टरला नुकसान पोहोचवते. जर ही परिस्थिती गंभीर झाली तर किडनी निकामी देखील होऊ शकते.

व्हिटॅमिन डी चा अतिरेक झाल्यास कोणती लक्षणे दिसतात?

तज्ज्ञ म्हणतात की, शरीरात जास्त व्हिटॅमिन डी ची लक्षणे लगेचच दिसून येत नाहीत. असं असताना जेव्हा ही लक्षणे दिसतात तेव्हा पुढील लक्षणे दिसतात

मळमळ आणि उलट्या
खूप तहान लागणे
वारंवार लघवी होणे
स्नायूंमध्ये कमकुवतपणा
गोंधळ किंवा अत्यंत थकवा
पाठीच्या खालच्या भागात किंवा बाजूला वेदना

या लक्षणांव्यतिरिक्त जर व्हिटॅमिन डी मुळे किंडनीचे गंभीर नुकसान झाले तर किडनी निकामी होण्याची लक्षणेदेखील दिसू शकतात. यामध्ये पायांना सूज येणे, थकवा येणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे यांचा समावेश आहे.

व्हिटॅमिन डी चा अतिरेक कसा टाळावा?

व्हिटॅमिन डी चा अतिरेक साधारणपणे तेव्हा होतो जेव्हा लोक डॉक्टरांचा सल्ला न घेता आहार घेतात, व्हिटॅमिन डी असलेली अनेक उत्पादने वापरतात किंवा देखरेखीशिवाय हाय डोस इंजेक्शन घेतात. हे टाळण्यासाठी कायम डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच व्हिटॅमिन डी घ्या आणि शिफारस केलेल्या डोसपेक्षा जास्त घेऊ नका. तुम्ही घेत असलेल्या आहारात व्हिटॅमिन डी आणि कॅल्शियमचे प्रमाण निरोगी राहण्यासाठी आणि दुष्परिणाम टाळण्यासाठी नियमितपणे रक्त तपासणी करावी.

## ५ मिनिटांमध्ये हिरव्यागार मिरच्यांपासून बनवा
## चटपटीत झणझणीत लोणचं, वरण भाताला येईल रंगतदार चव

जेवणाच्या ताटात जर लोणचं असेल तर चार घास जास्त जातात. आंबट गोड तिखट चवीचे लोणचं खायला सगळ्यांचं खूप जास्त आवडत. लोणचं पाहिल्यानंतर अनेकांच्या तोंडाला पाणी सुटते. आंब्याचे लोणचं, गोड लोणचं, लिंबाचं लोणचं इत्यादी अनेक वेगवेगळ्या प्रकारची लोणची बनवली जातात. पण कायमच आंबट लोणचं खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही झणझणीत खाण्याची इच्छा होते. अशावेळी तुम्ही हिरव्यागार मिरच्यांपासून ५ मिनिटांमध्ये लोणचं बनवू शकता. जेवणाच्या ताटात मिरचीचं लोणचं असेल तर वरण भात अतिशय सुंदर लागतो. मिरचीच्या लोणच्यामुळे तोंडाची चव वाढते. कायमच बाजारात विकत मिळणारी लोणचं आणण्यापेक्षा घरी बनवलेले लोणचं चवीला अतिशय सुंदर लागते. विकतच्या लोणच्यात आंबटपणा वाढवण्यासाठी व्हिनेगरचा वापर केला जातो. पण आज आम्ही तुम्हाला कोणत्याही विकतच्या पदार्थांचा वापर न करता झणझणीत मिरचीचे लोणचं बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

साहित्य:
हिरव्या मिरच्या
जिरं
मोहरी
मेथी दाणे
मोहरीचे तेल
हिंग
काळे मीठ लाल मिरची
गूळ पावडर
धणे पावडर
पाणी

कृती:

हिरव्या मिरचीचे झणझणीत लोणचं बनवण्यासाठी सर्वप्रथम, हिरव्या मिरच्या स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर मिरच्या पुसून घ्या.



कढईमध्ये तेल गरम करून त्यात जिरे, मोहरी आणि मेथी दाणे घालून भाजा. त्यानंतर त्यात चिरून घेतलेल्या हिरव्या मिरच्या घाला.


मिरच्यांचा रंग बदलल्यानंतर त्यात मीठ, हिंग, काळे मीठ, लाल मिरची पावडर, हळद, धने पावडर, जिरे पावडर घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या.

त्यानंतर त्यात गुळाची पावडर घाला. एक वाफ आल्यानंतर थोडस पाणी घालून शिजवून घ्या. त्यानंतर गॅस बंद करून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले झणझणीत हिरव्या मिरचीचे लोणचं.

## वाढत्या वयानुसार किडनीची काळजी कशी घ्याल?
## मधुमेह, ब्लड प्रेशर असल्यास होऊ शकते गंभीर नुकसान


मूत्रपिंडाचे आजार हे कोणत्याही वयातील लोकांसाठी गंभीर ठरू शकतात. त्यातही वय वाढल्यानंतर म्हणजेच वृद्ध लोकांना मूत्रपिंड आणि मूत्रमार्गाच्या काही आजारांचा धोका जास्त असतो. त्यामुळे यासाठी कोणत्या गोष्टी कारणीभूत असतात, वय वाढल्यानंतर मूत्रपिंडाची काळजी कशी घ्यावी याबाबत सविस्तर जाणून घेऊ मूत्रपिंडाची जळजळ किंवा सूज मूत्रपिंडाची जळजळ किंवा सूज येणे हा प्रकार ग्लोमेरूलोनेफ्रायटिस सारख्या परिस्थितीमुळे होऊ शकतो. यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. वृद्धांमध्ये मूत्रपिंडाच्या आजाराचे सर्वात सामान्य कारण म्हणजे मधुमेह. मधुमेह नियंत्रित असला तरी रक्तवाहिन्या आणि नसांना नुकसान पोहोचू शकते. मूत्रमार्गाचा संसर्ग असल्याने हा संसर्ग मूत्रपिंडात पसरू शकतो. अशावेळी डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य, कारण उपचार न केल्यास कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते. महिलांमध्ये आणि वाढत्या वयानुसार मूत्रमार्गाचा संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो. मूत्राशयातून अनियंत्रित मूत्र गळतीदेखील संसर्ग होण्यास कारणीभूत ठरते. लघवीशी संबंधित समस्या असल्या वेळीच तपासून घ्या. कारण त्या अधिक गंभीर मूत्रपिंडाच्या समस्या किंवा पुरूषांमध्ये वाढलेली प्रोस्टेट पातळी यासारख्या स्थिती दर्शवू शकतात. रेनोव्हॅस्कुलर रोग चरबीचे साठे, कोलेस्ट्रॉल, कॅल्शियम आणि इतर पदार्थ रक्तवाहिन्यांच्या आतील थरात जमा होतात, त्यामुळे मूत्रपिंडाच्या धमनी अरूंद होतात किंवा अडथळा निर्माण होतो. यामुळे मूत्रपिंडांच्या फिल्टरवर परिणाम होतो आणि मूत्रपिंडांना रक्तपुरवठा कमी होतो. परिणामी उच्च रक्तदाब होतो आणि मूत्रपिंडाची कार्यक्षमता कमी होते. वृद्धांमध्ये मूत्रपिंड निकामी होण्याचे हे सर्वात सामान्य कारण आहे. वेळीच उपचार न केल्यास उच्च रक्तदाबामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि दृष्टी कमी होण्याचा धोका वाढू शकतो आणि मूत्रपिंडाचे नुकसान होऊ शकते. मूत्रपिंडाच्या (kidney)च्या आजाराची लक्षणे काय? उच्च रक्तदाब लघवीच्या प्रमाणात आणि संख्येत बदल लघवीच्या स्वरूपात बदल मूत्रात रक्त येणे पाय आणि घोट्यांमध्ये सूज येणे मूत्रपिंडाच्या भागात वेदना थकवा भूक न लागणे झोपेचा त्रास डोकेदुखी एकाग्रतेचा अभाव खाज सुटणे श्वास लागणे मळमळ आणि उलट्या तोंडात दुर्गंधी आणि धातूची चव वयानुसार मूत्रपिंडासंबंधी जोखमीचे घटक वय वाढत असताना मूत्रपिंड आणि मूत्रमार्गावर परिणाम करणारे काही आजार अधिक सामान्य होतात. तुम्हाला मूत्रपिंडाचा आजार होण्याचा धोका जास्त असतो जर तुम्हाला पुढील आजार आहेत, ६० वर्षांपेक्षा जास्त वय मधुमेह लठ्ठपणा उच्च रक्तदाब हृदयरोग किंवा स्ट्रोक झाला असल्यास धूम्रपान करणे मूत्रपिंड निकामी झाल्याचा कौटुंबिक इतिहास तीव्र मूत्रपिंडाच्या दुखापतीचा इतिहास दीर्घकालीन मूत्रपिंडाचा आजार असलेल्या लोकांना हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता दोन ते तीन पट जास्त असते आणि डायलिसिसवर अशलेल्या तसंच प्रत्यारोपित मूत्रपिंड असलेल्या लोकांसाठी हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधी रोग हे मृत्यूचे प्रमुख कारण ठरू शकते. मूत्रपिंड निरोगी कसे ठेवाल? तुम्हाला मधुमेह असेल तर तुमच्या रक्तातील साखरेचे नियंत्रण उत्तम आहे याची खात्री करा. इन्सुलिन इंजेक्शन, औषधे, आहार, शारीरिक हालचाली आणि तुमच्या रक्तातील साखरेचे निरीक्षण याबद्दल तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्याचे पालन करा. उच्च रक्तदाब नियंत्रित करा. तुमचा रक्तदाब नियमितपणे तपासा. रक्तदाब कमी करण्यासाठी वापरली जाणारी औषधे मूत्रपिंडाच्या आजाराचा विकास मंदावू शकतात. जर तुम्हाला मूत्रपिंडाच्या आजाराच्या जोखमीच्या घटकांपैकी एक असेल, तर किमान दर दोन वर्षांनी मूत्रपिंडाच्या आरोग्याची तपासणी करा. मूत्रमार्गाच्या संसर्गावर त्वरित उपचार करा. आवश्यक असल्यास आहार आणि औषधांनी रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करा. भरपूर पाणी प्या आणि साखर, चरबी आणि मीठ कमी असलेले पण फायबर जास्त असलेले पदार्थ निवडा. धूम्रपान, मद्यपान पूर्णपणे बंद करा. तुमच्या उंची आणि वजनानुसार निरोगी वजन ठेवा दिवसातून किमान ३० मिनिटे मध्यम व्यायाम करण्याचा प्रयत्न करा.



## 'हे' पदार्थ खाल्ल्यानंतर चुकूनही पिऊ नका पाणी विषारी ठरू शकते यांचे मिश्रण

पाणी हे आपल्या शरीराचे अन्न आहे, जे आपले शरीर आतून स्वच्छ करण्यास मदत करते, शरीर हायड्रेटेड ठेवते आणि शरीराचे अवयव योग्यरित्या कार्य करतात. शरीर निरोगी ठेवण्यासाठी दररोज दीड ते दोन लिटर पाणी पिणे महत्त्वाचे आहे. ते पचन, पोषक तत्वांचे शोषण आणि एकूण शरीराच्या कार्यात मदत करते. ते चयापचय नियंत्रित करते, बद्धकोष्ठता प्रतिबंधित करते आणि दिवसभर ऊर्जेची पातळी राखते. पाणी आरोग्यासाठी आवश्यक आहे. साधारणपणे पाणी पिणं फायदेशीर मानलं जात असलं तरी, काही पदार्थ खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचन बिघडू शकते. काही पदार्थ जे नैसर्गिकरित्या पाण्यासारखे असतात, त्यात जास्त पोषक घटक असतात. ते पाण्यात मिसळल्यास पचनावर परिणाम होऊ शकतो.

लाइफ सायन्सेस जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, जेवणानंतर लगेच पाणी प्यायल्याने पाचक एन्झाइम कमकुवत होऊ शकतात आणि पचन मंदावते. आयुर्वेदाने जेवणानंतर किमान ३० मिनिटे वाट पाहण्याची शिफारस केली आहे. जेणेकरून पाचक शक्ती मजबूत राहील आणि पचन योग्य राहील. आता प्रश्न उद्भवतो की कोणते पदार्थ खाल्ल्यावर पाणी प्यावे आणि किंवा कोणते पाणी प्यावे तसंच कोणते नाही हे कसे ओळखावे. कोणते पदार्थ खाल्ल्यानंतर सेवन केल्यास आम्लता वाढते आणि आतड्यांचे आरोग्य बिघडते ते जाणून घेऊ



टरबूजमध्ये अंदाजे ९६ टक्के पाणी असते. जेवणानंतर लगेच जास्त पाणी प्यायल्याने पचनावर परिणाम होऊ शकतो. टरबूजमध्ये आधीच भरपूर पाणी असते, त्यामुळे खाल्ल्यानंतर जास्त पाणी प्यायल्याने पाचक रस पातळ होऊ शकतो, पचन मंदावते आणि पोटफुगी वाढते. टरबूज खाल्ल्यानंतर किंमान ४० ते ५० मिनिटे थांबून पाणी पिणे उत्तम.

केळं खाल्ल्यानंतर पाणी पिऊ नये केळामध्ये पोटॅशियम, फायबर आणि नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त असते. केळी खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने मळमळ आणि पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. केळी पचण्यासाठी पुरेसे पाचक एन्झाइम आणि आम्ल आवश्यक असते. केळी खाल्ल्यानंतर जर तुम्हाला पाणी प्यायचे असेल तर अर्धा तास थांबा.

लिंबूवर्गीय फळे संत्री, लिंबू आणि द्राक्ष यासारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये फायबर, व्हिटॅमिन सी आणि अँटी–ऑक्सिडंट्स असतात. असं असताना खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचनावर परिणाम होऊ शकतो. लिंबूवर्गीय फळे पोटात आम्ल उत्पादन वाढवतात आणि पाणी प्यायल्याने हे संतुलन बिघडू शकते. त्यामुळे गॅस, पोटफुगी किंवा पचनाच्या समस्या उद्भवू शकतात. लिंबूवर्गीय फळे खाल्ल्यानंतर किमान अर्धा तास पाणी पिणं टाळा.

शेंगदाण्यांसोबत पाणी पिऊ नका शेंगदाण्यांत प्रथिने असतात आणि शरीराचे तापमान वाढवून चयापचय वाढवतात. शेंगदाणे खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचन मंदावते. प्रामुख्याने मुलांमध्ये. पाण्यामुळे पचन प्रक्रिया मंदावते. त्यामुळे पोटात जडपणा किंवा अस्वस्थता येऊ शकते. शेंगदाणे खाल्ल्यानंतर २० ते ३० मिनिटे पाणी पिऊ नका.

दुधासोबत पाणी पिऊ नका दुधात कॅल्शियम, प्रथिने आणि आवश्यक जीवनसत्वे असतात. गरम दूध प्यायल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. पाणी दुधाच्या पचनासाठी आवश्यक असलेले आम्ल आणि एन्झाइम पातळ करते, त्यामुळे चयापचय मंदावतो आणि पोटातील आम्लता वाढते. दूध प्यायल्यानंतर किमान ३० मिनिटे ते १ तास थांबा आणि मग पाणी प्या.

# चार जणांनी बौध्द मुलाला बेदम मारहाण करून जिवे मारण्याची दिली धमकी!

## मारहाण करणाऱ्या चौघांविरुद्ध केज पोलिसांत अॅट्रॉसिटी अॅक्ट नुसार गुन्हा दाखल!

केज/प्रतिनिधी:– आमच्या मुलीला मोबाईल वरून मेसेज का केलास या आरोपावरून एकुरका गावातील एका बौध्द मुलाला गावातील चौघांनी घरातुन उचलुन रानात नेहुन जबर मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने हे बौध्द कुटुंब भयभीत झाले असुन मारहाण करणाऱ्यांवर केज पोलिसांत ट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबत अधिक माहिती अशी की,केज तालुक्यातील एकुरका गावातील उमेश अशोक कोकाटे वय १७ वर्षे या बौध्द मुलाला गावातील चार जणांनी जबरदस्तीने उचलीत नेहुन जबर मारहाण केली आहे. तर उमेश यास त्याच्या राहात्या घरी बसलेले असताना दि.३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशीराम मोरे मोटारसायकलवरून घरी आले व उमेश यास म्हटले की आपल्याला पेंडीचे पोते आणायचे आहे. तु चल असे म्हटले असता उमेश याने त्यांचे सोबत जाण्यास नकार दिल्याने मोटारसायकलवरून आलेल्या सचिन अभिमान मोरे व गणेश तुळशीराम मोरे यांनी त्याला ओढुन गाडीवर बसवून नेमण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात उमेशची आई तिथे आली तुम्ही असे का करता म्हणुन त्या दोघांच्या तावडीतुन आपल्या मुलाला सोडण्याचा प्रयत्न करत असताना सचिन मोरे आणि गणेश मोरे या दोघांनी उमेशच्या आईला ढकलून दिल्याने ती खाली पडली तसेच या झटापटीत उमेची आई हिचे झंपर फाटले उमेश ची आई खाली पडल्याचे पाहून सचिन मोरे व गणेश मोरे या दोघांनी उमेश यास सांगितले की तुझे पप्पा आमच्या शेतात आहेत.तिथे एक काम आहे.तु आमच्या सोबत चल असे म्हणून त्याला मोटारसायकल वर टाकून शेतात नेहले. सदरील मोटारसायकल सचिन मोरे चालवत होता.तर गणेश मोरे मागे बसुन उमेश यास दोघांच्या मध्ये घेऊन शेतात नेहले. गाडी थांबताच गाडीवरून खाली उतरत असताना सचिनने पाठिमागुन ढकलल्यामुळे उमेश हा जमिनीवर पडला.त्या दोघांनी उमेश यांस सचिन मोरे यांचे वडील अभिमान मोरे व तुळशीराम मोरे यांच्या समोर नेहले असता अभिमान मोरे यांनी उमेश यास म्हटले की तू आमच्या पोरीला मेसेज का केलास असे म्हणून उमेश यास मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यास माफी मागायला लावुन त्याचा त्यांच्या मोबाईल मध्ये व्हिडिओ शूटिंग करून घेतली. व परत मारहाण करण्यात आली.यावेळी अभिमान मोरे याने धेडग्या,माहरड्या तुझी लायकी आहे का आमच्याशी बोलण्याची अशी जातीयवाचक शिवीगाळ केली. व तु असे पुन्हा केलेल्यास तुला ठार मारुत अशी धमकी दिली. त्यानंतर तुळसीराम मोरे सचिन यांच्या हातातील लोखंडी रॉड घेऊन उमेश याच्या




पाठित जबर मारहाण केली.त्यामुळे उमेश खाली जमीनीवर पडला त्यानंतरही न थांबता तुळशीराम मोरे याने उमेश याच्या पोटात लाथा बुक्या आणि चपलाने जबर मारहाण केली. वरील सर्वांनी मिळून उमेश यास लाथा बुक्याने आणि लोखंडी रॉडने जबर मारहाण केल्याने उमेश हा काही काळ बेशुद्ध पडला. यावेळी उमेश यास काही कळत नव्हते. काही वेळानंतर उमेश यांचे वडील अशोक ऊध्दव कोकाटे यांना फोन करून घटनेची माहिती दिली. उमेश यास सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशीराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे व तुळशीराम केशव मोरे या चौघांनी उमेश अशोक कोकाटे यास लोखंडी रॉड,चापटाबुक्या, बुटासह चपलाने जबर मारहाण करून जातीवाचक शीवीगाळ करत उमेश यास जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी केज पोलिसांत उमेश अशोक कोकाटे यांस जबर मारहाण करणाऱ्या सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशीराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे व तुळशीराम केशव मोरे यांचे विरुद्ध केज पोलिसांत ट्रॉसिटी क्ट नुसार भा.न्या. सं.(बी एन एस ) २०२३ कलम ११५ (२), ११८(१), ३५२, ३५१(१) व अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम,१९८९ ३(२)(ी), ३(१)(ी) व ३(२)(ीं) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस अधीक्षक यांचे मार्गदर्शन खाली केज पोलिस करत आहेत. मात्र या घटनेमुळे एकुरका गावातील कोकाटे कुटुंब भयभीत झाले असुन त्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे.

# आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार लातूर जिल्ह्यात आपली ताकद दाखवून देईल : पाटील

लातूर: आगामीस्थानिकस्वराज्यसंस्थांच्यानिवडणुकांमध्ये लातूर जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आपली ताकद दाखवून देईल. शरदचंद्र पवारांचा विचारच आम्हाला नेत्रदीपक यश मिळवून देणार असल्याचा विश्वास पक्षाचे नवनियुक्त ग्रामीण जिल्हाध्यक्ष माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांनी गुरुवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. लातूर जिल्हा राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पाटील यांच्यावर पक्षाच्या नेतृत्वाने ही जबाबदारी सोपवली आणि राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता घोषित झाली. त्यामुळे आपल्या नियुक्तीची घोषणा अत्यंत अडचणीच्या काळात झाल्याचे सांगून विनायकराव पाटील पुढे म्हणाले की, आजच्या राजकीय परिस्थितीबद्दल फारसे न बोललेलेच बरे. राज्यात महायुतीच्या सरकारकडून, त्यांच्या मंत्र्यांकडून दिलेली आश्वासने, शब्द पाळले जात नसल्याने सामान्य मतदारांना आता पश्चाताप होत आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने मतदार आता महाविकास आघाडीकडे वळताना दिसत आहेत. विद्यमान सरकार – त्यांच्या मंत्र्यांकडून सामान्यांची दिशाभूल केली जात आहे. लोकांना कसे बनवले जात आहे, ते आपण स्थानिक स्वराज्यच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकांसमोर आणणार आहोत. आजही शरदचंद्र पवार यांना , त्यांच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग राज्यात आहे. शरद पवारांचे विचारच आम्हाला येणाऱ्या काळात विजयी करणार आहेत, असे पाटील यांनी सांगितले. निवडणुकीच्या तोंडावर आपल्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली असली तरी आपण अतिशय कमी कालावधीत जिल्ह्याचा दौरा करून कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेणार आहोत. संघर्षातून यश कसे संपादन करायचे हे आपल्याला माहिती आहे. येणाऱ्या निवडणुका कार्यकर्त्यांसाठीच्या असल्याने जेथे पक्षाची ताकद मोठी आहे तेथे आपण जास्त जागांवर लढण्याचा आग्रह महाविकास आघाडीकडे धरणार आहोत. या निवडणुकीबाबतचा निर्णय स्थानिक – जिल्हा पातळीवर घेण्याच्या



सूचना असल्याने परिस्थितीनुरूप निर्णय घेतले जातील. अजित पवारांचा पक्ष आणि एकनाथ शिंदेंची सेना सोडून स्थानिक पातळीवर आघाडी करण्याबाबतही विचार होऊ शकतो. या निवडणुकीच्या माध्यमातून भाजपच्या विचारांना धडा शिकवण्याचा प्रयत्न करू. पक्ष सोडून गेल्यानं आता त्यांच्या चुका समजल्या असून आगामी काळात आपल्या पक्षातील इनकमिंग वाढल्याचे दिसून येईल, असेही त्यांनी सांगितले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासंदर्भात बोलताना बाबासाहेबांचे कार्यकर्ते कोण तर, त्यांचा मुलगा, भाऊ, पुतण्या हे त्यांच्या घरातील उमेदवारच उभे करण्यासाठी आग्रही राहू शकतात. परिवाराच्या पुढे त्यांचा पक्षच नसल्याचा आरोप करुन आपल्या घरातून फक्त आपणच राजकारणात आहोत. त्याशिवाय कुटुंबातून कोणीही राजकारणात येणार नसल्याचे त्यांनी बोलून दाखविले . स्थानिकच्या निवडणुकीत जिल्ह्यात आपल्या पक्षाची ताकद लवकरच दाखवून देऊ. कार्यकर्त्यांना न्याय मिळवून देण्याकामी आपण कधीही मागे हटणार नाही,असा विश्वासही विनायकराव पाटील यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजाभाऊ मणियार यांनी प्रास्तविक केले. यावेळी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड. संभाजीराव पाटील , प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, डॉ. बापूसाहेब पाटील, प्राचार्य प्रशांत घार, इंजि. विनायक बगदुरे, मल्लिकार्जुन करडखेले , रशीद शेख, सोमेश्वर कदम, माधव गंगापुरे , बालाजी कदम, प्रदीप खोमणे, अॅड. शेखर हविले, अॅड. निशांत वाघमारे, रामराजे अत्राम , अॅड.इरफान शेख, सलीम घंटे, अॅड. सुरेश साकोळकर, नरेंद्र पाटील, सुदाम पवार, नेमीचंद पाटील, अॅड. आर. झेड. मालपाणी, फेरोज सय्यद, सिराज सय्यद आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र पोलीस दलातील साहित्यिक उत्तम तरकसे यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा..!

नवी मुंबई:– नवी मुंबई खारघर पोलीस ठाणे येथे तथागत भगवान गौतम बुद्ध, छ शिवाजी महाराज, छ संभाजी महाराज, आद्य समाज सुधारक ज्योतिबा फुले,छ शाहू महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित सुप्रसिद्ध साहित्यिक कवी–लेखक आणि अभ्यासू विचारवंत महाराष्ट्र पोलीस दलातील स्थित कार्यरत नवी मुंबई गुन्हे शाखेत असलेले पोलीस अधिकारी श्री उत्तमराव दासू तरकसे यांचा ५५ वाढदिवस नवी मुंबई येथील खारघर पोलीस ठाणे येथे विश्व मांगल्ये सभा खारघर यांच्या माध्यमातून सौ मेघनाताई सौ प्राचीताई सौ मैथिली आणि सौ सुचितांताई यांनी समाजभूषण श्री उत्तमराव दासु तरकसे यांचे खारघर पोलीस स्टेशनमध्ये रांगोळी काढून त्यांचे औक्षण करत त्यांचा ५५ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला



सदर कार्यक्रमादरम्यान खारघर पोलीस ठाणे येथील पीएसआय सोनवणे पीएसआय चव्हाण पोलीस आमलदार कांबळे महिला पोलिसा आमलदार पार्टे मॅडम तसेच सर्व पोलीस ठाणे तील अधिकारी व अंमलदार तसेच विश्व मांगल्ये संस्थेचे इतर पदाधिकारी व सदस्य तसेच खारघर नवी मुंबई मधील आसपासच्या परिसरातील सुज्ञ नागरिक व समाजभूषण उत्तम तरकसे यांच्या चाहता वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन करत पुढील उल्लेखनीय प्रगती करिता सर्वांनी त्यांच्यावर मंगलमय शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला

सदर कार्यक्रमाचे आयोजन विश्वमंगल्ये संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य व नवी मुंबई पोलीस दलातील सर्व अधिकारी व अंमलदार तसेच नवी मुंबई परिसरातील उपस्थित सुज्ञ नागरिक व चाहत्या वर्गांचे आभार मानत त्यांचा नवीन गरीबाची भाकर करपली हा कथासंग्रह लवकरच प्रकाशित होत असल्याची वाचकांना गोड बातमी देत सर्व कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे व विश्व मांगल्ये संस्थेने सदर कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे व सर्व अधिकारी अंमलदारांचे मनःपूर्वक आभार मानत कार्यक्रमाची सांगता करण्यात आले

# केज नगरपंचायतच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी जिल्हा नियोजन मधून ६ कोटी ३० लक्ष रुपयाचा निधी मंजूर

## राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या प्रयत्नाला यश

केज/प्रतिनिधी :– केज नगरपंचायतच्या माध्यमातून केज शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत ६ कोटी ३० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध कित्येक वर्षापासून केज शहर विकासापासून कोसो दूर होते परंतु गेल्या तीन–चार वर्षांपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पवार पक्षाचे जेष्ठ नेते हारुणभाई इनामदार व कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा सौ.सीताबाई बनसोड यांच्या आथक परिश्रमाने केज शहराचा चेहरा मोहरा बदलताना दिसत आहे. यावेळी आम्ही पाहिलेले स्वप्न साकारताना दिसत असल्याचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी बोलताना आपले मत व्यक्त केले. याचबरोबर केज शहरात विविध विकासकामे गेल्या तीन–चार वर्षात होत आहेत आणि काही कामे प्रगतीपथावर आहेत. यावेळी बोलताना पाण्याचा प्रश्न मोठा गंभीर असतानाही आम्ही संकटाला तोंड देत केज वासियांना पाणीपुरवठा करत आहोत यात पाणीपुरवठ्याची योजना अंतिम टप्प्यात असून या कामासाठी १२९ कोटींची योजना तांत्रिक मान्यता पर्यंत मंजूरी साठी अंतिम टप्प्यात आहे. काही दिवसात हे काम प्रत्यक्षात चालू होईल असे मत हारुणभाई इनामदार यांनी बोलताना स्पष्ट केले. तर केज शहराच्या स्वच्छतेसाठी स्वच्छता ग्रह बांधण्याचा निर्धार करण्यात आला आहे यामुळे स्वच्छ शहर सुंदर शहर या माध्यमातून झाल्याशिवाय राहणार नाही यामध्ये बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच आमदार नमिताताई मुदडा खासदार रजनीताई पाटील रमेश रावजी आडसकर यांच्या प्रयत्नामुळे केज शहराला निधी उपलब्ध झाला असे मत व्यक्त करून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी आम्हाला जिल्हा नियोजना मधुन निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल दादांचे आभार व्यक्त केले. केज शहरातील विकास कामे ही दलित वस्ती सुधारण्यासह मूलभूत कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून शहरात ज्या भागांमध्ये दलित वस्ती आहे अथवा दलित नागरिक हे ज्या भागात राहतात. या निधीमुळे शहराच्या विकासाला एक नवी दिशा मिळाली. मागील तीन ते चार वर्षापासून ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या प्रयत्नातून केज शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करण्यात आला असून जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या नगरपरिषद प्रशासन विभागाने एकाच दिवशी तीन प्रमुख योजनेतील कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. सहा कोटी तीस लक्ष रुपयाचा निधी दिल्यामुळे केज शहराच्या विकासासाठी भर पडली असून या मंजूर निधीमध्ये महाराष्ट्र नगरोत्थान महाबियन जिल्हास्तरीय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



नागरिक दलित वस्ती सुधार योजना आणि नागरी दलिततेत्तर वस्ती सुधार योजना या महत्त्वाच्या तीन योजनांचा समावेश आहे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना व अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांची लोकसंख्या असलेल्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी हा निधी वापरण्यात येणार आहे व शहरातल्या अन्य भागात मूलभूत सुविधा साठी निधीचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शहरातील अनेक ठिकाणचे नाल्या,रस्ते, पिण्याच्या पाण्यासाठी पाईपलाईन, स्वच्छता, शहरातील काही मुख्य रस्ते तर काही जोड रस्त्यांचे कामे पूर्ण झालेले आहेत तर उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरित कामे मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत लवकरच केज शहराच्या विकासासाठी आम्ही वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्यांनी शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणार आहोत असे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी बोलताना स्पष्ट केले,

# पोराच्या डीलमधील स्टॅम्प ड्युटीचे काय?

पुणे : प्रतिनिधी काही दिवसांपूर्वी एका भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफीच्या मुद्यावरून शेतक–यांना सुनावले होते. ज्यानंतर आता पार्थ पवारांच्या कंपनीचा जमीन व्यवहाराचा घोटाळा समोर येताच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पवारांना कर्जमाफीच्या मुद्यावरून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांच्या औंर्ि ड्रमर्ल्ल्र२ छछढ नावाच्या कंपनीने, १८०४ कोटींची महार वतनाची जमीन ३०० कोटींना घेतली असल्याची माहिती समोर आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर पुराव्यासहित ही माहिती पोस्ट केली आहे. पार्थ पवार यांच्याशी संबंधित या जमीन खरेदीची ही माहिती समोर आल्यानंतर राज्यात खळबळ उडाली आहे. पण याच मुद्यावरून आता दमानिया यांनी शेतक–यांना कर्जमाफीवरून सुनावणा–या उपमुख्यमंत्री अजित पवारांना खडेबोल सुनावले आहेत. तर पोराच्या डीलमधील (महार वतनाच्या जमिनीचा व्यवहार) स्टॅम्प ड्युटीचे काय? असा सवाल दमानिया यांनी उपस्थित केला. काही दिवसांपूर्वी एका भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफीच्या मुद्यावरून शेतक–यांना सुनावले होते. ''कर्जमाफीबाबत जूनला निर्णय घ्यायचे ठरले आहे. तो कसा होईल ते आम्ही एप्रिलमध्ये तुम्हाला सांगू. पण तुम्हीसुद्धा शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यावर वेळच्या वेळी पैसे परत करण्याची सवय लावा ना. सारखंच फुकटात, सारखंच माफ.. कसे व्हायचे? असे चालत नाही.'' असे पवारांनी म्हटले होते.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर–४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.